# लोकशाहीवर राजकीय घराणेशाहीची छाया

*घराणेशाही हा भारतीय लोकशाहीमध्ये वारंवार दृगोचर होणारा अंतःस्थ प्रवाह आहे.*

भारतातील निवडणुकीच्या राजकारणात (विशेषतः नेहरू-गांधी घराण्यातील) एखादा सदस्य प्रवेश करतो तेव्हा घराणेशाहीच्या आकांक्षांचा मुद्दा व त्यासंबंधीचे वितंडवाद नव्याने सुरू होतात. काँग्रसने अलीकडेच प्रियांका गांधी-वड्रा यांना पक्षाचं सरचिटणीस केलं आणि उत्तर प्रदेशच्या पूर्व प्रांताची धुरा त्यांच्यावर सोपवली, तेव्हा पंतप्रधानांसह भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) इतर सदस्यांनी उभा केलेला बागुलबुवाही या परिस्थितीला अपवाद नव्हता. विशेषाधिकारी कुटुंबाची पार्श्वभूमी असलेल्या व्यक्तीने राजकारणात प्रवेश केल्याने हा वितंडवाद जिवंत राहातो. यातील युक्तिवाद समतावादी लोकशाहीच्या बाजूचे असल्याचं भासत असलं, तरी या अप्रामाणिक व त्याहीपेक्षा आत्मसंतुष्ट वितंडेचे परिणाम मूक स्वरूपाचे असतात. घराणेशाहीच्या आकांक्षा लोकशाहीच्या मूळ समतावादी गाभ्यालाच छेद देणाऱ्या आहेत, असं सांगत भाजपच्या प्रवक्त्याने नेहमीप्रमाणे स्वतःच्या पक्षाचं वेगळेपण दाखवायचा प्रयत्न केला. पण खुद्द भाजपमध्येही घराणेशाहीचा व्यवहार सुरू असल्यामुळे लोकशाहीतील या विरोधाभासाला उत्तेजनच मिळतं. त्यामुळे काँग्रेसमध्ये घराणेशाही आहे, असं म्हणणारा भाजप स्वतःमधील घराणेशाही काँग्रेसपेक्षा नक्की कोणत्या निकषांवर वेगळी आहे, हे सांगायला धजावत नाही.

या पार्श्वभूमीवर भाजपने दिलेली प्रतिक्रिया ढोंगी आहे, एवढंच नव्हे तर ती प्रतिक्षिप्त स्वरूपाची आहे. लोकशाहीचा समतावादी आशय खोलवर पोचवण्यामध्ये समानता व न्याय या तत्त्वांची भूमिका सर्वांत महत्त्वाची असते, परंतु घराणेशाहीच्या आकांक्षांचं राजकीयीकरण केल्याचे नकारात्मक परिणाम या तत्त्वांवर होतात, याची दखल भाजपच्या प्रतिक्रियेतून घेतली जात नाही.

रुढीवादी आणि त्यामुळे मर्यादा घालणाऱ्या कौटुंबिक बंधनांपासून प्रबुद्ध नागरिक व्यक्तिगत पातळीवर परिवर्तनकारी फारकत घेतात तेव्हा लोकशाहीला समतावादी कल प्राप्त होतो. सार्वजनिक प्रश्नाला कटिबद्ध असलेला नागरिक किंवा सार्वजनिक हितासाठी सर्वोत्तम कामगिरी करू पाहणारी व लोकशाही अवकाश वापरणारी प्रबुद्ध व्यक्ती जातीय, धार्मिक, लिंगभावात्मक किंवा कौटुंबिक आश्रयदातृत्वावर विसंबून राहाणं नाकारते. संपत्ती, राजकीय संपर्क व मनुष्यबळ (यात पक्ष कार्यकर्तेही आले) यांच्या संचित सामग्रीतून हे आश्रयदातृत्व तयार झालेलं असतं. हा आधार नाकारणाऱ्या स्वायत्त व्यक्तींसाठी कौटुंबिक आश्रयदातृत्व ओझ्यासारखं बनतं, कारण त्यांना स्वतःची ओळख निश्चित करण्याचा अवकाश यातून सापडत नाही, आणि लोकशाही व्यवहारामध्ये असा अस्सल अवकाश गरजेचा असतो. विरोधकांवर टीका करण्यासाठी घराणेशाहीचा आधार घेणारं लघुदृष्टीचं राजकारण करण्याचा परिणाम असा होतो की, कुटुंबापासून फारकत घेऊन अस्सल स्पर्धात्मक अवकाशाद्वारे राजकारणात प्रवेश करू इच्छिणाऱ्या काही संभाव्य सक्षम व्यक्तींनाही पायबंद घातला जातो.

समकालीन निवडणुकीच्या राजकारणामध्ये यशस्वी कारकीर्द घडवू पाहणाऱ्यांसाठी विशेषाधिकारी घराणी हा मुख्य संदर्भ बिंदू ठरला आहे. निवडणुकीय

लोकशाहीमध्ये निर्णयकर्त्या संस्थांचं नियमन करण्याबाबत आणि त्यासंबंधीचे निर्णय घेण्याबाबत काही घराण्यांना किंवा विस्तृत परिवारांना प्रबळ स्थान मिळालेलं दिसतं. विशेषतः निवडणुकांआधी व दरम्यानच्या काळात पदांच्या वाटपावर या घराण्यांचं नियंत्रण असतं. शिवाय, पक्षाच्या निवडून गेलेल्या कायदेमंडळ सदस्यांवरही या घराण्यांना पूर्ण नियंत्रण ठेवता येतं. आपल्या सूचनांचं पालन न करणाऱ्या कायदेमंडळ-सदस्यांना शिस्त लावून किंवा पक्षात व सार्वजनिक संस्थांमध्ये इतर कायदेमंडळ-सदस्यांना नियुक्त करून संबंधित घराणी आपलं नियंत्रण टिकवून ठेवतात.

बिलियर्डमध्ये बॉल जाळ्यात टाकण्यासाठी वापरल्या जाणाऱ्या क्यू-स्टिकप्रमाणे ही घराणी स्वतःकडील विशेषाधिकारांचा वापर करतात. सत्ता सहजतेने वाहत नसते; घराण्यावर निष्ठा राखणाऱ्यांना हक्क म्हणून नव्हे तर बक्षिस म्हणून सत्तेचं वाटप केलं जातं. ही नवीन प्रकारची सरंजामशाही असते. समतावादी लोकशाहीच्या खऱ्या प्रेरणेच्या विरोधात जाणाऱ्या राजकारणाला बळी पडलेले लोकही दुर्दैवाने या सरंजामशाहीलाच अनुसरत जातात. काही दलित व आदिवासी कुटुंबांमध्येही घराणेशाहीची आकांक्षा विकसित झाली आहे, त्यामुळे ते स्वतःच्या कुटुंबातूनच वारसदारांची भरती करतात.

काही दलित व आदिवासी कुटुंबेही आपल्या घराण्यालाच राजकीय संदर्भ बिंदू मानत आहेत, त्यामुळे राजकीय सत्तेची घराणेशाहीनुसार संघटना हा जवळपास एक नियमित आकृतिबंध ठरला आहे. किंबहुना हा एक प्रस्थापित नियम होण्याचा धोका आहे. वारशानुसार उत्तराधिकारी निवडला जाणाऱ्या समाजांमध्ये प्रस्थापित पदं पूर्वनिर्धारित असतात, आणि त्यासंबंधीच्या निर्णयाला अनुयायांच्या निष्ठेद्वारे वैधता पुरवली जाते. निवडणुकीय लोकशाहीमध्ये घराणेशाहीद्वारे राजकीय उत्तराधिकारी ठरणं हे प्रस्थापिततेच्या कायद्यासारखं आहे.

अशा वेळी निवडणुकीय अवकाशांचं लोकशाहीकरण करण्यासाठी दृढमूल घराण्यांचा प्रभाव कसा कमी करायचा? हे उद्दिष्ट गाठण्यासाठी काही प्रयत्न निश्चितपणे केले गेले आहेत. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या पातळीवर स्त्रियांचं सबलीकरण करण्यासाठी झालेल्या ७३व्या व ७४व्या घटनादुरुस्त्या, हा अशाच प्रकारचा घराणेशाहीचा वरचष्मा कमी करण्याचा एक प्रयत्न होता. पण राजकारणावरील आपलं नियंत्रण पुनर्प्रस्थापित करण्यासाठी पितृसत्ताक घराणी काही ना काही मार्ग शोधून काढतात. 'मी शासन करेन आणि शासितही असेन' हे ॲरिस्टॉटलच्या विचारातील लोकशाहीचं नैतिक तत्त्व या कुटुंबांमधील स्त्रियांना प्रभावित करत नाही आणि घराणेशाहीची बंधनं तोडून त्या वंचितांच्या बाजूने उभ्या राहात नाहीत. उलट, 'आमचं घराणं शासन करेन आणि शासन करतच राहील अथवा इतरांकडून शासित ठरायचं नाकारेल,' हे घराणेशाहीचं तत्त्वच या कुटुंबांकडून पाळलं जातं. अशा नैराश्यपूर्ण परिस्थितीमध्ये सर्वसामान्य मतदारांना स्वतःच्या शहाणीवेचा वापर करावा लागेल आणि स्वतःकडील निर्णयाची सत्ता वापरून समता व न्याय ही दुहेरी लोकशाही तत्त्वं प्रस्थापित करावी लागतील, तरच आपल्या सद्सद्विवेकाद्वारे घराणेशाहीची सत्ता क्षीण होत जाईल.

●


## लेख/वर्गणी पाठवण्याचा/पत्रव्यवहाराचा **नवा** पत्ता

परिवर्तनाचा वाटसरू, ५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११

भ्र. ७७७६९०२२६७

# उत्तर प्रदेशातील विरोधकांची व्यूहरचना

*आपण वेगळे आहोत हे दाखवण्यासाठी काँग्रेसने घेतलेले पवित्रे व केलेली प्रतिपादनं राजकीय कार्यक्रमांविषयीच्या गोंधळलेपणाचे निदर्शक आहेत.*

उत्तर प्रदेशात अलीकडे घडलेल्या राजकीय घडामोडी केंद्रातील सत्ताधारी आघाडीच्या विरोधातील शक्तींना बळकटी आणण्याची शक्यता आहे. बहुजन समाज पक्ष (बसप) व समाजवादी पक्ष (सप) यांच्यातील युती कणखर स्वरूपाची सामाजिक आघाडी म्हणून पुढे आली आहे, आणि उत्तर प्रदेशातील भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) निवडणुकीतील कामगिरीला या आघाडीमुळे मोठी हानी पोहोचू शकते. शिवाय, प्रियांका गांधी-वड्रा यांना काँग्रेसच्या सरचिटणीसपदी नियुक्त करण्यात आलं आहे आणि उत्तर प्रदेशाच्या पूर्व भागातील प्रचाराची सूत्रं त्यांच्या हाती देण्यात आली आहेत; या निर्णयामुळे त्यांच्या पक्षाचं २०१९च्या लोकसभा निवडणुकांमधील भवितव्य उजळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जाते आहे. उत्तर प्रदेश राज्य भाजपसाठी महत्त्वाचं आहे, कारण आत्तापर्यंत जेव्हा-जेव्हा केंद्रात भाजपने सत्ता मिळवली तेव्हा त्यांच्या सुमारे एक चतुर्थांश ते एक पंचमांश जागा उत्तर प्रदेशातून आलेल्या होत्या. त्यामुळे, उत्तर प्रदेशात निवडणुकीचा निकाल पालटण्याची शक्यता आहे आणि आगामी सार्वत्रिक निवडणुकांमध्ये पराभवाचा धोका भाजपला भेडसावू लागला आहे.

उत्तर प्रदेशात भाजपचा पाडाव करण्यासाठी कोणताही प्रयत्न होत असेल तर त्याला मोठा आधार बसप व सप यांच्या संयुक्त शक्तीद्वारे मिळतो, हे उघड आहे. या दोन्ही पक्षांचा सामाजिक पाया घट्ट आहे, त्यामुळे त्यांच्याद्वारे भाजपसमोर मोठी आव्हानं उभी राहातात. त्यांच्याशी संबंधित सामाजिक गटांमध्ये काही अंतर्विरोध आहेत, त्यामुळे या दोन पक्षांमध्ये दीर्घ काळ वैरभाव रुजला होता. पण आता बसप व सप यांनी या वैरभावावर मात केली आहे. आदित्यनाथ यांच्या सत्ताकाळात हिंदुत्ववादी उच्च जातीय आक्रमकता/प्रतिपादकता वाढत गेल्यामुळे बसप व सप यांच्यातील अंतर्विरोध मूक झाले आहेत किंवा दुय्यम ठरले आहेत. त्यामुळे या दोन पक्षांची युती केवळ स्वतःच्या राजकीय टिकावासाठी झालेली नाही, तर त्यांना आपापल्या सामाजिक आधारगटांमधूनच आघाडीसाठीचा दबाव जाणवू लागला होता, त्यामुळे २५ वर्षांमध्ये पहिल्यांदाच त्यांनी हातमिळवणी केली आहे. इतर विरोधी पक्ष सहायक भूमिकेतून त्यांच्या सोबत आल्यावर या आघाडीची समीकरणं अधिक बळकट होतील. विद्यमान सरकारबाबत नाराज झालेल्या मतदारांना दुसरा ध्रुव म्हणून या आघाडीचा पर्याय स्वीकारता येईल. राष्ट्रीय लोक दल किंवा निशाद (निर्बल इंडियन शोषित हमारा आम दल) यांसारखे लहान पक्ष आघाडीमध्ये सामावले जाण्याच्या तयारीत आहेत, परंतु काँग्रेसचा यात सहभाग नाही. केवळ काही मोजक्या जागा लढायला मिळतील, अशा पद्धतीची सहायक भूमिका स्वीकारण्यास काँग्रेस इच्छुक नाही, त्यामुळे ही परिस्थिती उद्भवली आहे. अखिल भारतीय पक्ष, या आपल्या स्थानापासून खाली येण्याची काँग्रेसची तयारी नसावी. प्रियांका गांधी वड्रा यांना पक्षाच्या कामकाजात सहभागी करून पक्षाचं हे स्थान अधोरेखित करण्याचा व उत्तर प्रदेशातील कार्यकर्त्यांमध्ये उत्साह निर्माण करण्याचा काँग्रेसचा प्रयत्न आहे.

या निर्णयानंतर तत्काळ मोठा गाजावाजा झाला असला, तरी उत्तर प्रदेशातील काँग्रेसचं सध्याचं सामर्थ्य व संघटनाबांधणी यांचा विचार करता, उत्तर प्रदेशात काँग्रेस हा तिसरा ध्रुव किंवा प्रमुख आव्हानकर्ता बनेल का, याविषयी शंका आहे. अशा प्रकारे तिसरा ध्रुव निर्माण झाल्यास उच्चजातीय मतपेढीतील (जे बसप-सप आघाडीला बहुधा मतदान करणार नाहीत अशा गटांमधील) मोठा वाटा त्याच्याकडे जाईल आणि

भाजपला आणखी फटका बसेल, असं मानणारा एक वर्ग आहे. अशा विश्लेषणामध्ये उच्चजातीयांच्या राजकीय धूर्तपणाकडे पुरेसं लक्ष दिलं जात नाही. विशेषतः कनिष्ठ जातीयांकडून कणखर आव्हान उभं राहिलं असेल, तेव्हा हा धूर्तपणा अधिक जागरूकतेने कार्यरत होतो. शिवाय, विरोधी मतांमधील अगदी लहान फटींनीही उत्पन्न होणाऱ्या जोखमींचा विचार या विश्लेषणात केला गेलेला नाही. स्वतःचं वेगळं स्थान प्रतिपादित करून मतविभागणीचा धोका स्वीकारण्याची काँग्रेसची तयारी आहे, यावरून राजकीय अग्रक्रमांविषयी त्यांचं आकलन किती गोंधळलेलं आहे, हे दिसून येतं.

सार्वत्रिक निवडणुकांच्या संदर्भात सर्वांत मोठी विरोधी शक्ती म्हणून काँग्रेसला स्वतःसमोर तीन संभाव्य उद्दिष्ट ठेवता येतील. एक, लोकांच्या जीवनाला व उपजीविकेलाच नव्हे तर या देशाच्या सामाजिक विणीलाही धोका निर्माण करणाऱ्या विद्यमान सरकारला खाली खेचणं; दोन, स्वतःची संघटनात्मक पुनर्बांधणी करणं व स्वतंत्र सामर्थ्य वाढवणं; तीन, निवडणुकांनंतर काँग्रेसचा पंतप्रधान सत्तेवर आणणं. सर्वसाधारणतः ही तीन उद्दिष्टं परस्परांपासून विलग नसतात, पण काँग्रेस पक्षाची सद्यस्थिती व राजकीय शक्तींच्या सहसंबंधांमधील भिन्नता लक्षात घेता या उद्दिष्टांमध्ये निवड करण्याची वा अग्रक्रम ठरवण्याची वेळ पक्षावर येऊ शकते. यातील पहिलं उद्दिष्टच प्राधान्याने साध्य करायला हवं, असं स्वाभाविकपणे वाटू शकतं. हे उद्दिष्ट साध्य करायचं तर भाजपेतर मतं स्वतःकडे खेचावी लागतील. विरोधी पक्षांच्या अनुभवी नेत्यांनी नमूद केल्याप्रमाणे, त्या-त्या राज्यातील सर्वाधिक सक्षम विरोधी शक्तीच्या सोबत जाऊन हे साध्य करता येईल. हे घडण्यासाठी तार्किकदृष्ट्या उपरोल्लेखित दुसरं उद्दिष्ट बाजूला ठेवावं लागेल (काँग्रेस ही सर्वांत सक्षम विरोधी शक्ती असलेल्या राज्यांमध्ये इतर पक्षांनाही हे लागू होतं) आणि व्यक्तिगत आकांक्षांवर मर्यादा घालावी लागेल. हे करण्याची काँग्रेसची इच्छा नाही, म्हणून त्यांनी उत्तर प्रदेशात स्वतंत्रपणे लढण्याचा निर्णय घेतलेला दिसतो. यामुळे तिथली निवडणुकीय स्पर्धा तीन ध्रुवांमधील होणार आहे. आपण 'आक्रमकतेने खेळतो आहोत', असा दावा काँग्रेस करत असला, तरी प्रत्यक्षात एकाच वेळी भिन्न उद्दिष्ट साध्य करण्याची त्यांची खटपट सुरू असल्याचं दिसतं.

बसप-सप आघाडीमागील तर्क केवळ निखळ व्यावहारिकतेपुरता मर्यादित नाही, तर खोलवरच्या सामाजिक शक्तींमधून तो निपजलेला आहे, त्याचप्रमाणे राज्यागणिक आघाड्या करण्याचा मुद्दा केवळ व्यूहात्मक नाही. या देशाच्या विभिन्न आणि विषम सामाजिक-राजकीय वास्तवामध्ये याची मुळं रुजलेली आहेत. भाजप व संघ परिवार यांचा राजकीय प्रकल्प एकप्रवाही व अधिसत्तावादी आहे, त्यामुळे या विविधतेला ते सातत्याने दडपू पाहतात. शेवटी हेच त्यांच्या नाशालाही कारणीभूत ठरू शकतं. या राजकीय प्रकल्पाला एखादा विश्वसनीय पर्याय उभा करायचा असेल, तर त्याच्या संघटनात्मक रूपामध्ये व राजकीय कार्यक्रमाच्या आशयामध्ये या विभिन्न व विषम वास्तवाची अभिव्यक्ती दिसावी लागेल. परंतु, हे वास्तव मान्य करण्याची काँग्रेसची इच्छा दिसत नाही. भारतातील सामाजिक वास्तवाचं एकमेव अस्सल प्रतिबिंब आपल्याच पक्षामध्ये पडलेलं आहे, असा त्यांचा ठाम समज आहे. त्यामुळे उपरोल्लेखित पर्याय प्रत्यक्षात आणण्यासाठीचा एक उत्प्रेरक घटक ही भूमिका निभावणं काँग्रेसला जमत नाही. सर्वांत मोठा भाजपेतर पक्ष म्हणून काँग्रेसकडे अशा पर्यायी शक्तीचं नेतृत्व येऊ शकतं. परंतु, व्यक्तिगत उद्दिष्टं बाजूला ठेवून इतर राजकीय शक्तींच्या दाव्यांचीही दखल घेतली तरच ही नेतृत्वाची भूमिका काँग्रेसला निभावता येईल. उत्तर प्रदेश या भारतातील सर्वांत मोठ्या राज्यामध्ये काँग्रेसने टाकलेली पावलं पाहता या संदर्भात त्यांना अजून बरंच काही शिकावं लागेल, असं दिसतं.

●

# भाजपचं अविचारी राजकारण

*सत्ता टिकवून ठेवण्याची किंवा सत्ता परत मिळवण्याची तीव्र आकांक्षा असलेल्या पक्षाकडून अविचारी राजकारण केलं जातं.*

निवडणुकीच्या राजकारणात विरोधी पक्षांची एकजूट घडवणारी कोणतीही घडामोड हा आपल्या निवडणुकीय भवितव्यासाठी मोठा धोका आहे, अशी भारतीय जनता पक्षाची (भाजप) धारणा आहे. या आव्हानाला सामोरं जाण्यासाठी भाजप कोणत्या प्रकारची राजकीय साधनं वापरतो आहे, असा प्रश्न यातून उपस्थित होतो. विरोधकांचा प्रभाव निवळवण्यासाठी भाजपकडून वापरली जाणारी साधनं सूक्ष्म आणि त्याच वेळी निर्लज्जपणे नैतिकदृष्ट्या आक्रमकता धारण करणारी आहेत. सार्वजनिक जीवनाच्या मुख्य क्षेत्रांमधील सरकारच्या अपयशाबाबत वैध प्रश्न उपस्थित करणाऱ्यांविरोधात ही साधनं वापरली जात आहेत. हंगामी अर्थसंकल्पात अंतर्भूत असलेला अवाजवी लोकानुनय, आपल्या विरोधकांविषयीचे नाजूक तपशील नोंदवणाऱ्या गोपनीय फायली ठेवणं व गरज पडेल तेव्हा त्यांचा वापर करणं, केंद्रीय अन्वेषण विभागासारख्या (सीबीआय: सेन्ट्रल ब्यूरो ऑफ इन्व्हेस्टिगेशन) नियामक संस्थांचा असाधारण वेळी व असाधारण संदर्भात असाधारण वापर करणं, आणि शेवटी, राजकीय विरोधकांवर शाब्दिक हल्ले चढवणं, अशा साधनमार्गांचा यात समावेश आहे. पण अशा साधनांचा राजकीय वापर अविचारी असल्याचं दिसतं. आपलं स्थान 'विरोधकां'हून सबळ करण्यासाठी इतर कोणतीही ठोस भूमी भाजपला सापडत नसल्याचा संदर्भ या घडामोडींना आहे. गेल्या साडेचार वर्षांमधील कामगिरीआधारे काही दावा करणं सत्ताधारी पक्षाला शक्य दिसत नाही. २०१४ सालच्या निवडणुकीतील विजयामधून मिळालेला आत्मविश्वास अलीकडेच पाच राज्यांतील विधानसभा निवडणुकांमध्ये झालेल्या पराभवामुळे रोडावला आहे. निवडणुकांमध्ये लाभ व्हावा यासाठी राजकीय साधनांचा मेहनती वापर करण्याऐवजी चलाख वापर करण्याचा केंद्र सरकारचा व भाजपचा प्रयत्न आहे, हे स्पष्टच आहे. विश्वासार्ह कामगिरीच्या अभावी भाजप अविचारीपणे आपल्या विरोधकांना 'गुंतवण्या'साठी हे प्रकार करतो आहे.

संभाव्य निवडणुकीय धोक्यावर मात करण्यासाठी अशा राजकीय साधनांचा बेधुंद वापर करून सत्ता टिकवून ठेवण्यासाठी भाजप उतावीळ झाला आहे. हा उतावीळपणा तीन पातळ्यांवर दिसून येतो. बँकांची फसवणूक केलेल्या माणसाला लंडनहून भारतात परत आणण्याची कृती हे आपलं यश असल्याचं सरकारी प्रवक्ते आतापासूनच बोलू लागले आहेत. परंतु, या दाव्यामध्ये काही अंगभूत समस्या आहे, कारण आर्थिक गुन्हेगाराला परत आणण्यासाठी प्रयत्न करावे लागणं हे यशापेक्षाही अपयशाचं निदर्शक आहे. अशा घटनेला नाट्यमय रूपात सादर केल्याने केवळ अंतिम निष्पत्ती अधोरेखित केली जाते, पण अशा बँकांना फसवणाऱ्या गुन्हेगारांचं उत्पादन करण्यात सरकारची भूमिका काय असते ही प्रक्रिया समोर येत नाही. निराळ्या शब्दांत सांगायचं तर, सरकार ज्या समस्येवरील उपायाचं श्रेय स्वतःकडे घेतं आहे त्या समस्येला गंभीर बनवण्यात सरकारचाच हातभार आहे. एकत्रीकरणाच्या राजकारणात अंतिम निष्पत्ती नव्हे तर आरंभ महत्त्वाचा असतो. घोटाळा टाळण्यात आपल्याला अपयश आलं, हे कबूल करायला सरकार तयार नाही. शेतकऱ्यांना आधी वंचित करायचं आणि मग त्यांना दिलासा देणारा निर्णय घेतल्यासारखं दाखवायचं, अशातलाच हा प्रकार आहे. सहा हजार रुपयांइतकं तुरळक अंशदान दिल्याने प्रतिष्ठित जगण्याचा अधिकार शेतकऱ्यांकडून हिरावला जातो, हे लक्षात घेतलं जात नाही. काही उद्योगपतीही अशाच प्रकारे आधी पर्यावरणाची हानी करतात आणि मग या

हानीवर उपाय देऊ पाहतात. बेरोजगारी व शेतीकडे केलं जाणारं दुर्लक्ष यांसारख्या गंभीर समस्यांवरून मतदाराचं लक्ष विचलित करण्यासाठी एखादा कार्यक्रम/इव्हेन्ट निर्माण करण्याचं राजकारण खेळलं जातं.

दोन, एकत्रीकरणाच्या राजकारणाचा भाग म्हणून सरकार स्वतःच्या 'जवळिकी'तील विरोधकांच्या साथीने घडामोडी पार पाडत असतं आणि परस्परांच्या हितसंबंधांचं एकत्रीकरणं साधलं जातं. जवळचा विरोधक शेवटी सरकारला स्वतःच्या आश्वासनांमधील तुटवडा भरून काढायला मदत करतो. आपण 'सार्वजनिक विवेकबुद्धीचे संरक्षक' आहोत, असा दावा करणारे अनेक नेते सरकारविरोधात उपोषणाला बसतात, आणि त्यातून सरकार फक्त आणखी काही आश्वासनं देतं. नैतिक त्यागाचा शेवट केवळ सरकारी आश्वासनांच्या वाढीमध्ये होतो. निवडणुकीय राजकारणात स्वतःचा जम बसवण्याचे हे काही सूक्ष्म मार्ग आहेत. परंतु, भाजपने आपल्या काही राजकीय विरोधकांना वैयक्तिक पातळीवर हैराण करायचे मार्गही वापरायला सुरुवात केली आहे. या सत्ताधारी पक्षाने सूक्ष्मरित्या फसवणुकीची साधनं आत्मसात केली आहेत, त्यामुळे आधी ते काही कार्यक्रम तयार करतात, मग सरकारच्या प्रयत्नांना देदिप्यमान यशाप्रमाणे सादर करण्यासाठी या कार्यक्रमांचा वापर करतात.

तीन, नैतिक आक्रमक असणारी राजकीय साधनं वापरण्याबाबत भाजप नेते निरपवादपणे काळजी घेत नाहीत असं दिसतं. उदाहरणार्थ, भाजपतील काही अतिशय जबाबदार नेते पंतप्रधानांची प्रतिमा उंचावलेली दाखवण्यासाठी विरोधी पक्षांमधील नेत्यांबाबत अत्यंत खालच्या पातळीवरील भाषा वापरत आहेत.

वैध टीकेला अशा प्रकारे बळजबरीने दडपून सत्ताधारी पक्ष व त्यांचं सरकार असं सुचवू पाहात आहे की, आपल्याला उत्तर द्यावं लागू नये यासाठी विरोधकांनी मुळात प्रश्नच विचारायला नकोत. पोकळ आश्वासनांचं निर्माण व पुनर्निर्माण करणारं अविचारी उतावीळ राजकारण पाहता विरोधकांनी वेळेमध्ये उत्तरं मिळवण्यासाठी सरकारला जाब विचारायला हवा. ●

---

## आकडेवारीसमोरचं संकट?

*अधिकृत आकडेवारीची (डेटा) विश्वासार्हता टिकून राहण्यासाठी सांख्यिकी संस्थांची स्वायत्तता अत्यावश्यक आहे.*

राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाच्या (एनएससी : नॅशनल स्टॅटिस्टिकल कमिशन) दोन स्वतंत्र सदस्यांनी राजीनामा दिल्यामुळे पुन्हा एकदा भारतातील सार्वजनिक संस्थांच्या स्वायत्ततेचा मुद्दा ऐरणीवर आला आहे. विश्वासार्ह अधिकृत आकडेवारी तयार करण्यासोबतच ही आकडेवारी सार्वजनिक अवकाशात उपलब्ध होईल याची तजवीज करण्यासाठी २००६ साली एनएससीची स्थापना करण्यात आली. पण राजीनामा दिलेल्या सदस्यांनी नमूद केल्यानुसार ही मूलभूत आवश्यकताही संस्थेकडून पूर्ण होत नव्हती. राष्ट्रीय नमुना सर्वेक्षण कार्यालयाने (एनएसएसओ : नॅशनल सॅम्पल सर्व्हे ऑफिस) जुलै २०१७-जून २०१८ या कालावधीसाठीचा कालिक श्रमशक्ती सर्वेक्षण (पीएलएफएस : पिरिऑडिक लेबर फोर्स सर्व्हे) अहवाल सादर केला आणि एनएससीने डिसेंबर २०१८मध्ये त्याला मंजुरीही दिली, परंतु सरकारने हा अहवाल प्रकाशित न करण्याचं ठरवलं. सांख्यिकी आयोगाचा राजीनामा दिलेल्या सदस्यांनी नीती आयोगाविषयीही काही चिंता व्यक्त केली आहे. नीती आयोग एनएससीशी सल्लामसलत करत नाही आणि या महत्त्वाच्या सांख्यिकी संस्थेला नजरेआड करायचा प्रयत्न करतो, असं या सदस्यांनी म्हटलं आहे.

एनएससीची परिणामकारकता व स्वायत्तता क्षीण

करण्याचा नीती आयोगाचा हा पहिलाच प्रयत्न नाही. नीती आयोग आणि केंद्रीय सांख्यिकी कार्यालय (सीएसओ : सेन्ट्रल स्टॅटिस्टिक्स ऑफिस) यांनी २०११-१२ हे पायाभूत वर्ष पकडून पूर्वलक्ष्यी स्वरूपाची सकल घरेलू उत्पन्नाची (जीडीपी) नवीन अधिकृत आकडेवारी नोव्हेंबर २०१८मध्ये जाहीर केली होती, तेव्हाही एनएससीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करण्यात आलं. सांख्यिकी आयोगाच्या उपसमितीचा अहवालही उलटा फिरवून आधीच्या सरकारपेक्षा आताच्या सरकारची वृद्धीविषयक कामगिरी चांगली आहे, असं सिद्ध करायचा प्रयत्नही नीती आयोगाने केला. एनएससीच्या अहवालात नमूद केलेल्या आकडेवारीपेक्षा बऱ्याच प्रमाणात भिन्न आकडेवारी तेव्हा देण्यात आली होती. त्या वेळी तज्ज्ञांनी या कृतीवर बरीच टीकाही केली. नीती आयोग व एससीओ या संस्था अधिकृत आकडेवारीशी छेडछाड करत आहेत, असं तेव्हा बोललं गेलं.

एनएसएसओ अहवाल प्रकाशित होणं महत्त्वाचं आहे, कारण त्यासाठी करण्यात आलेलं सर्वेक्षण देशातील रोजगाराच्या स्थितीबाबत विश्वासार्ह आकडेवारी पुरवू शकतं. विशेषतः निश्चलनीकरण आणि वस्तू व सेवा कर या निर्णयांच्या अंमलबजावणीनंतर रोजगाराची अवस्था काय आहे, याचा अंदाज त्यातून येऊ शकतो. कुटुंब स्तरावर झालेल्या सर्वेक्षणासंदर्भातील या अहवालाची वाट पाहिली जात होती, तरीही सरकारने त्याचं प्रकाशन का थांबवलं? सरकारच्या दाव्यांना छेद देणारं देशातील रोजगाराचं निराशाजनक चित्र या अहवालातून उभं राहातं, असं सर्वसाधारणतः मानलं जातं आहे.

सरकारने प्रकाशन रोखून धरलेल्या एनएसएसओ अहवालातील काही आकडेवारी माध्यमांकडे फुटली, त्यातूनही यावर शिक्कामोर्तब झालं. देशातील रोजगाराचं संकट किती भीषण आहे, हे त्यातून स्पष्ट होत होतं. फुटलेल्या अहवालानुसार, २०१७-१८ या वर्षामध्ये सर्वसाधारण स्थितीनुसार (एका वर्षाच्या संदर्भ काळाच्या आधारे व्यक्तींच्या सक्रियतेची स्थिती) देशातील बेरोजगारीचा दर ६.१ टक्के होता, तर चालू साप्ताहिक स्थितीनुसार (सीडब्ल्यूएस : करन्ट वीकली स्टेटस) बेरोजगारीचा दर ८.९ टक्के इतका जास्त आहे. शहरी भागांमध्ये, हेच आकडे अनुक्रमे ७.८ टक्के व ९.६ टक्के इतके आहेत, तर ग्रामीण भागांमध्ये अनुक्रमे ५.३ टक्के व ८.५ टक्के इतके आहेत. शिवाय, (१५ ते २९ वर्षं वयोगटातील) तरुणाईमधील बेरोजगारीचा दर बऱ्यापैकी जास्त आहे. परंतु, श्रमशक्ती सहभाग दर (एलएफपीआर : लेबर फोर्स पार्टिसिपेशन रेट) ३६.९ टक्के इतका कमी होता. याचा अर्थ अधिकाधिक लोक- विशेषतः स्त्रिया श्रमशक्तीमधून बाहेर पडत आहेत. बेरोजगारीचा वाढलेला दर, कमी एलएफपीआर- हे आकडे भारतासारख्या लोकसांख्यिक पातळीवर लाभदायी अवस्थेत असलेल्या वाढत्या अर्थव्यवस्थेला साजेसे नाहीत.

राजीनामा दिलेल्या सदस्यांनी व्यक्त केलेल्या चिंता फारशा महत्त्वाच्या नसल्याचं दाखवायचा प्रयत्न राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकारने आगामी लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर केला. ही आकडेवारी अजूनही केवळ मसुदा स्वरूपात उपलब्ध असल्याचं सरकारच्या वतीने सांगण्यात आलं. एनएसएसओचा अहवाल केवळ 'मसुद्या'च्या टप्प्यावर असणं शक्य आहे, पण हा अहवाल प्रकाशित व वितरित झाला तर रोजगाराचं वाढतं संकट त्यातून समोर येईल, हे नाकारता येणार नाही. संसदेत आणि माध्यमांसमोर रालोआ सरकार रोजगारनिर्मितीचे जे काही दावे करतं आहे, त्यांना फोल ठरवण्यासाठी ही आकडेवारी विरोधकांना उपयोगी पडेल. सुमारे एक कोटी नोकऱ्या निर्माण करण्याचं आश्वासन रालोआने २०१४च्या निवडणुकांपूर्वी दिलं होतं. दुसऱ्या बाजूला ही आकडेवारी प्रकाशित झाली तर बेरोजगारी गेल्या ४५ वर्षांतील सर्वांत खालावलेल्या स्थितीत असल्याचं स्पष्ट होईल. हे सांख्यिकी सत्य प्रकाशित झालं तर आपणच संकटात

अडकू, हे दिल्लीतील केंद्र सरकारचं पुरतं माहीत आहे. या वर्षी होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ही वस्तुस्थिती सरकारला घातक ठरेल.

बेरोजगारीविषयीचा अहवाल व आकडेवारी याचे पडसाद चांगल्या राजकारणावर आणि कणखर आर्थिक विश्लेषणासाठीच्या मूल्यांकन मूल्यावर पडतात. अशा सांख्यिकी माहितीद्वारे शासक वर्गाला व्यापक जनतेच्या हितासाठी अधिक जागरूक धोरण आखायला मदत होते. गुंतवणूकदारांना व उद्योजकांना त्यांच्या आर्थिक कामकाजाच्या नियोजनासाठीही ही आकडेवारी सहायक ठरते. पण यातील रूढ नियमांना टाळून आणि एनएससीचे निर्णय फेटाळून नीती आयोगाने संबंधित सांख्यिकी संस्थेच्या स्वायत्ततेचा अनादर केला आहे, आणि असं करताना अधिकृत सांख्यिकी आकडेवारीच्या विश्वासार्हतेवर विपरित प्रभाव टाकला आहे.

●

---

## रालोआच्या हंगामी अर्थसंकल्पाची दिशा कोणती?

*अवाजवी लोकानुनयातून निर्माण होणाऱ्या आकांक्षा केवळ वक्तृत्वापुरत्या राहातात.*

आगामी निवडणुका लढवायच्या तयारीत असलेलं मावळतं सरकार सर्वसाधारणतः आपल्या सत्ताकाळाच्या अखेरीला जादुई छडीप्रमाणे हंगामी अर्थसंकल्प सादर करतं. राष्ट्रीय लोकशाही आघाडी (रालोआ) सरकारचं हंगामी अर्थसंकल्पीय निवेदन याला अपवाद नाही. (अवाजवी) लोकानुनयी उत्पन्न आधार व कर सवलतींच्या घोषणांचा भडीमार करणाऱ्या या अर्थसंकल्पाचा वापर या सरकारने अपेक्षेप्रमाणे स्वतःच्या राजकीय प्रतिमेला सुधारण्यासाठी केला आहे. परंतु, 'हंगामी' अर्थसंकल्पासारख्या तात्पुरत्या गोष्टीला संभाव्य दीर्घकालीन राजकीय लाभासाठी वापरण्याचा या सरकारचा प्रयत्न मात्र अभूतपूर्व आहे. यातील अर्थसंकल्पीय निवेदन म्हणजे आणखी एक निवडणूक लढवण्यासाठीचा सत्ताधारी पक्षाचा जाहीरनामा आहे, शिवाय विद्यमान राजकीय वातावरणात आकांक्षाचं राजकारण खेळण्याची क्लृप्ती म्हणूनही हे निवेदन वापरण्यात आलं आहे.

उदाहरणार्थ, अल्पभूधारक शेतकऱ्यांना जाहीर करण्यात आलेला ६,००० रुपयांचा वार्षिक उत्पन्न आधार किंवा पंतप्रधान शेतकरी सन्मान निधी योजना, हा या अर्थसंकल्पातील खर्चाचा एक नवीन गट आहे. या रकमेचा अपुरेपणा वादाचा विषय आहेच, पण या योजनेचे राजकीय पडसाद अधिक मूलगामी असणार आहेत. निवडणुकांपूर्वी या योजनेनुसार २,००० रुपयांचा पहिला हप्ता देण्यात आला तर विद्यमान सरकार मतं विकत घेत आहे असा थेट आरोप होईल. दुसऱ्या बाजूला, रकमेचं वाटप निवडणुकांनंतर करायचं ठरलं, आणि भारतीय जनता पक्षाच्या (भाजप) नेतृत्वाखालील सरकार सत्तेत आलं, तर सरकारने निवडणुकीतील निवडीवर विपरित प्रभाव टाकल्याचा आरोप विरोधक करतील. पुन्हा निवडून आलेल्या सरकारला आश्वासन पूर्ण करता आलं नाही, तर आणखीच बेअब्रू होईल. भाजपेतर सरकारला कामगिरीसाठी आणखी जास्त दबाव पेलावा लागेल. अशा योजनेची लोकप्रियता लक्षात घेता, सरकारी तिजोरीवर भार पडला तरीही कोणतंच सरकार पहिल्यांदा ही योजना मागे घेणार नाही. किंबहुना, ही रक्कम तुरळक आहे, अशी टीका करून विरोधकांनी स्वतःलाच गोत्यात आणलं आहे. आपण सत्तेत आलो तर या आर्थिक आधारामध्ये वाढ करू, अशी अपेक्षा यातून त्यांच्या मतदारांमध्ये निर्माण होईल आणि या अपेक्षेला थोडा जरी छेद गेला, तरी त्यांच्या विरोधातील रोष वाढण्याचा धोका आहे.

‘पंतप्रधान योगी मानधन’ या असंघटित क्षेत्रातील निवृत्तवेतन योजनेबाबतही असाच धोका आहे.

विरोधकांमधील काँग्रेसच्या दृष्टीने ‘बेरोजगारी’ हा निवडणुकीतील एक मुद्दा असल्याचं दिसतं. बेरोजगारीचा दर वाढल्याबद्दल काँग्रेस अध्यक्ष राहुल गांधी यांनी सत्ताधाऱ्यांवर टीका केली आहे, एवढंच नव्हे तर विविध राजकीय सभांमध्ये रोजगाराचं आश्वासन दिलं आहे. अर्थात, बेरोजगारी हा मुळात श्रम बाजारपेठेसंबंधीचा रचनात्मक प्रश्न आहे आणि त्यावर सजग धोरणात्मक कृती करावी लागेल, हे त्यांनी लक्षात घेतलेलं नाही. कोणत्याही धोरणासाठी बोलण्यासारखे मुद्दे आहेत कुठे? रालोआ व भाजप यांच्यावर विरोधकांनी पोकळ घोषणाबाजीचा आरोप केला आहे, पण काँग्रेस व सर्वसाधारणतः इतर विरोधी पक्षही त्याच पोकळपणात अडकलेले दिसतात. प्रतिघोषणाबाजीच्या राजकारणात राजकीय पक्षांमधील धोरणात्मक किंवा विचारसरणीवर आधारित भेद अधिकाधिक दुर्बोध झाले आहेत, त्यामुळे निवडणुकीतील निवडी या मुख्यत्वे मनोवृत्तीनुसार किंवा व्यक्तिकेंद्री पद्धतीने होतात. मतदार त्यांचे ‘प्रतिनिधी’ निवडतात, तेव्हा त्यांच्या सामाजिक-आर्थिक अवस्थेचं व प्रश्नांचं प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीविषयी त्यांचं ‘आकलन’ काय आहे एवढाच निकष वापरला जातो. या पार्श्वभूमीवर असंघटित क्षेत्रासाठी निवृत्तीवेतन योजना लागू करण्याचा सत्ताधारी पक्षाचा निर्णय म्हणजे अनेक अर्थांनी एक मास्टर स्ट्रोक आहे. एक, रोजगारासंबंधीच्या आकडेवारीवरून अलीकडेच वादविवाद झडला आहे, अशा वेळी भारतीय रोजगार बाजारपेठेच्या असुरक्षिततेची मूक कबुलीच या घोषणेतून दिली गेली आहे. दोन, समस्या मान्य करण्यापाठापोठ तिच्यावरील उपायाची आश्वासनंही देण्यात आली आहेत. ऐतिहासिकदृष्ट्या सर्वाधिक रोजगार पुरवणाऱ्या क्षेत्रापुरती तरी ही आश्वासनं दिली आहेत. तीन, असं करताना मावळत्या सरकारने पुढील सरकारला टिकून राहण्यासाठी एक उच्च पण ठिसूळ बेंच मार्क आखून दिला आहे.

बोलघेवड्या आश्वासनांच्या अव्यवहार्यतेमुळे आकांक्षाकेंद्री राजकारणाच्या अनिश्चिततेत भर पडली आहे. शेतकऱ्यांना उत्पन्न आधार देणारी योजना असो किंवा पंतप्रधान योगी मानधन योजना असो, किंवा पाच लाख रुपये किंवा त्याहून कमी वार्षिक उत्पन्नाला आयकरातून पूर्ण सूट देण्याचा निर्णय असो, विरोधकांनीही प्रतिघोषणाबाजीचाच आधार घेऊन सत्ता मिळवली तर हे सर्व दुहेरी तलवारीसारखं ठरू शकतं. दुसऱ्या बाजूला या योजनांमधील कल्याणकारी सूर पाहता या योजना मागे घेणंही अवघड जाईल. पण, त्यांचं नियोजन करणं त्याहून अधिक अवघड असेल. उदाहरणार्थ, आयकरात सूट देण्याचं आश्वासन अंमलात आणायला वित्त विधेयकात दुरुस्त्या कराव्या लागतील, आणि ते करणं वेळखाऊ असणार आहे. मतदारवर्ग असा वेळ देईल की नाही, हे विद्यमान सरकारच्या इतर सवलतींच्या खैरातीवर अवलंबून असेल. दुसऱ्या बाजूला, यातील कोणतंही आश्वासन पूर्ण करण्यात प्रस्थापित सरकारला यश आलं, तर समाजाच्या दुसऱ्या घटकांकडून अधिक लाभासाठीचा दबाव वाढण्याची शक्यता आहे. भाजपने अलीकडेच १० टक्के राखीव जागांचं राजकारण केलं तेव्हा अशा आणखी गटाधारित मागण्या होऊ शकतात, हे दिसून आलं आहे. शिवाय, आपण पुन्हा निवडून आलो, तर उच्च-उत्पन्न गटातील नागरिकांनाही कराच्या बाबतीत सूट दिली जाईल, हे अर्थमंत्री पियुष गोएल यांचं आश्वासनही या गोंधळात भर टाकणारं आहे.

या पार्श्वभूमीवर आकांक्षाकेंद्री राजकारणाची आर्थिक व्यवहार्यता किती, हा प्रश्न तातडीने उपस्थित करावा लागतो. सरकारने स्वतःच दिलेल्या अंदाजी आकडेवारीनुसार, आश्वासित लाभ अंमलात आणायचे असतील तर त्यासाठी ३.४ टक्क्यांची वित्तीय तूट सहन करावी लागेल -३.३ टक्क्यांच्या सुधारित अंदाजापेक्षा हा आकडा केवळ ०.१ टक्क्यांनी जास्त आहे. पण हे वित्तीय गणित फसव्या गृहितकांवर आधारित आहे, असा सर्वसाधारण समज आहे. नाममात्र

सकल घरेलू उत्पन्नाची वाढ ११.५ टक्के इतकी अवाजवी असेल आणि भारतीय रिझर्व बँक व इतर सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडून अधिक लाभ मिळणार आहे, अशा गृहितकांचा यात समावेश आहे. सरकारमध्ये बदल झाल्यास बँकांसोबतच्या संस्थात्मक रचना बदलतील. आर्थिक वृद्धीला पुनरुज्जीवित करायचं असेल, तर रचनात्मक परिवर्तनासाठी काही प्रामाणिक धोरणात्मक कृती करणं आवश्यक आहे. वित्तीय विषमता वेगाने वाढते आहे आणि तातडीने सवलती मिळाव्यात यासाठी राजकीय खटपटीतून दबाव आणला जातो. अशा वेळी पर्यायी प्रस्थापित सरकार अशा कृतींवर दीर्घकालीन लक्ष केंद्रित करू शकेल का? हंगामी अर्थसंकल्प हा केवळ मतपेढीला भुलवण्यापुरता मर्यादित नाही, तर स्वतःचा ठोस भिन्न राजकीय कार्यक्रम व इच्छाशक्ती दाखवण्यात अपयशी ठरलेल्या कोणत्याही संभाव्य पर्यायी सरकारसाठी गळफास ठरणारा हा अर्थसंकल्प आहे.

●

---

## मृत्यूच्या सापळ्यातील खाणकाम

*खाणकामाच्या बोगद्यांमध्ये आणि नालेसफाईच्या कामांमध्ये मृत्युमुखी पडणाऱ्यांची वाढती संख्या समावेशक विकासाच्या दाव्यांवर प्रश्नचिन्ह उमटवणारी आहे.*

मेघालयातील 'रॅटहोल' प्रकारच्या खाणींमध्ये कामगारांचा शोकात्म मृत्यू झाल्यानंतर तरी 'सबका साथ, सबका विकास' या घोषणेच्या समर्थकांना लाज वाटायला हवी. विकासाच्या असमान प्रक्रियेमध्ये काही समाजघटक प्राणघातक रोजगारात अडकलेले आहे, त्यांना 'संपत्ती' खणून बाहेर काढण्यासाठी रॅटहोल खाणींमध्ये जावं लागतं किंवा 'घाण' साफ करण्यासाठी मॅनहोलमध्ये उतरावं लागतं. उपजीविकेसाठी त्यांना हे काम करणं भाग पडतं.

मेघालयामध्ये रॅटहोल खाणकाम बेकायदेशीररित्या सुरू असतं. विशेषतः पूर्व जैन्तिया हिल्स परिसरात अशा प्रकारे खाणकाम होतं. यामध्ये शंभर किंवा अधिक मीटर खोल खड्डे खणले जातात, त्यात बांबूच्या डळमळत्या शिड्या सोडलेल्या असतात, आणि या खड्ड्यांमध्ये उंदराच्या बिळांसारखे आडवे बोगदे खोदले जातात. कोळशाचा भूमिगत साठा असेल, तिथे अशा प्रकारे खाणकाम केलं जातं. नेपाळ, बांग्लादेश व आसाममधील स्थलांतरित कामगार आणि स्थानिकांपैकी सर्वांत असुरक्षित समाजघटक या कामामध्ये मोठ्या संख्येने उतरतात. ओल्या खड्ड्यांमध्ये रांगत जाऊन हे धोकादायक काम करावं लागतं. या भूमिगत कामासाठी नऊ किंवा कमी वयाची मुलं आणि बुटके मुलगे/पुरुष सर्वाधिक सोयीचे असतात. छोटी कुऱ्हाड, खुरपं आणि डोक्यांवर टॉर्च बांधून त्यांना बोगद्यांमध्ये सोडलं जातं. तिथे खाली वाकून सरकत पुढे जावं लागतं आणि खुरपून काढलेला कोळसा टोपल्यांमधून वरती पाठवावा लागतो. बराच वेळ हे काम असं सुरू राहातं.

कोणतंही नियमन नसलेला हा घातक उद्योग म्हणजे मेघालयातील 'कुटिरोद्योग' आहे, असं आत्तापर्यंत सांगितलं जात होतं, पण २०१४ साली राष्ट्रीय हरित लवादाने या खाणकामावर बंदी आणली. तरीही, ही बंदी अंमलात आणण्याचे कोणतेही गंभीर प्रयत्न झाले नाहीत. उलट, ही बंदी उठवण्याची आश्वासनं देत राजकीय पक्ष सत्तेवर येऊ लागले. राज्यामध्ये निवडणुकीसाठी पैशांचा मोठा स्रोत खाणकाम उद्योग हा आहे. अनेक विद्यमान मंत्री व आमदार खाणींचे चालक वा मालक आहेत. २०१८ साली झालेल्या निवडणुकांमधील अनेक उमेदवारांचे हितसंबंध

खाणकामात आणि वाहतुकीमध्ये गुंतलेले होते. खाणकामाचं नियमन करणाऱ्या केंद्रीय कायद्यांमधून मेघालयाला कधीही सूट मिळालेली नाही, तरीही आता सरकार 'बेकायदेशीरपणा'लाच वळसा घालू पाहतं आहे.

खाणींचा लाभ सर्वच स्थानिकांना होतो असं नाही. सामायिक जमिनीचं खाजगीकरण करून त्या मोजक्या लोकांच्या घशात घालण्याची प्रक्रिया खाणकामामुळे सुरू झाली. त्यामुळे खाणकाम होत असलेल्या जिल्ह्यांमध्ये वाढत्या प्रमाणात भूमिहीनता दिसते. जैन्तिया हिल्स प्रदेशात प्रति चौरस किलोमीटर परिसरात सरासरी पन्नासहून अधिक खाणी आहेत. कोळसा हा अर्थव्यवस्थेचा मुख्य आधारस्तंभ बनणं शोकांतिक आहे. खाणकामामुळे उपजीविकेचे इतर स्रोत रोडावले आहेत. अधिक भांडवल व संसाधनं असलेल्यांना अपरिहार्यरित्या अधिक नफा मिळतो, तर ज्या स्थानिकांच्या नावावर हे खाणकाम केलं जातं त्यांना कोळसासम्राटांच्या कृपेवर जगावं लागतं.

अशा प्रकारच्या एका अंधाऱ्या बोगद्यामध्ये १३ डिसेंबर २०१८ रोजी लाइटेन नदीचं पाणी घुसल्यामुळे १५ कामगार खाणीतच अडकले. तेव्हापासून बचावकार्य सुरू आहे, पण सुरुवातीचा महत्त्वाचा वेळ मात्र वाया गेला. खाणीतून पाणी बाहेर खेचण्याठी आवश्यक पंप दोन आठवड्यांनी घटनास्थळी पोचले. नौदल कृतिशील झाल्यानंतरही कामगारांची विघटित प्रेतं बाहेर काढणं अवघड झालं. त्याच जिल्ह्यात ६ जानेवारी २०१९ रोजी आणखी दोन खाणकामगार मृत्युमुखी पडले. गारो हिल्समध्ये अशाच प्रकारची घटना घडल्यानंतर राष्ट्रीय हरित लवादाने तिथे खाणकामावर बंदी लागू केली. २००२ साली ४० लोक अशाच पद्धतीने मरण पावले होते, तर २०१३ साली पाच कामगारांचा खाणीत चिरडून मृत्यू झाला. कोसळून, बोगद्यात अडकून आणि पाण्यात बुडून होणारे मृत्यू किंवा इजा- हे प्रसंग खाणकामाच्या प्रदेशात रोजच होतात. त्यासाठी कोणालाही जबाबदार धरलं जात नाही.

रॅटहोल खाणकाम पर्यावरणासाठीही विघातक आहे. जैन्तिया हिल्स हा प्रदेश 'मृत नद्यांची भूमी' मानला जाऊ लागला आहे. मोठ्या प्रमाणात गंधक आणि खनिज कचऱ्यामुळे इथल्या नद्या विषारी व आम्लयुक्त झाल्या आहेत, त्यामुळे मासे मरण पावले असून मातीची गुणवत्ताही खालावते आहे. खाणकामासाठी व कोळसा साठवून ठेवण्यासाठी हजारो एकरांचं वन व शेती नष्ट करण्यात आली आहे. हा प्रदेश विद्रुप व उद्ध्वस्त दिसतो, आणि ओसाड पडलेले पण न झाकलेले खड्डे मृत्यूसापळे बनले आहेत. पर्यावरणाची हानी, माफियांच्या कारवाया, बालमजुरी (२०१०मधील अंदाजी आकडेवारीनुसार इथल्या बाजमजुरांची संख्या ७० हजार इतकी आहे), तस्करी, आणि कामगारांच्या जीवनाविषयी व सुरक्षिततेविषयीची बेफिकीरी, यांमुळे नियमनाबाबतच्या सरकारी आश्वासनांवर विश्वास ठेवला जात नाही. वैज्ञानिक खाणकाम हे याच्यावरचं उत्तर ठरेल असं दिसत नाही, कारण कोळशाचे साठे खूप खोलवर असतात आणि पसरलेले असतात. त्यामुळे विस्तृत प्रदेशामध्ये खाणकाम करावं लागतं. शिवाय, इथला कोळसा चांगल्या गुणवत्तेचा नसतो, त्यामुळे आर्थिक व्यवहार्यताही कमी होते.

खाणींमध्ये व नाल्यांमध्ये होणाऱ्या वाढत्या शोकांतिकांची जबाबदारी कोणाची आहे? नव-उदारमतवादी काळामध्ये अशा प्रश्नांची उत्तरं मिळवणं अधिक अवघड झालेलं आहे. मेघालयाच्या या विशिष्ट संदर्भात बंदी घातलेली असून आणि नियमभंग होत असल्याचं माहीत असूनही खाणींचा व्यवसाय निर्धोकपणे सुरू आहे. खाणींच्या बोळांमध्ये माणसं उंदरांसारखं चार पाय करून रांगत जाऊ शकतात, पण तिथल्या भौगोलिक रचनेतून काही आपत्ती कोसळली तर उंदरांप्रमाणे बाहेर येणं त्यांना शक्य नसतं, याकडे दुर्लक्ष करून हा प्रकार सुरू आहे.

●

## हवामानबदल आणि गरीब समाजघटक

*तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर विकसनशील देशांमधील कित्येक दशकांची वृद्धी हवामानबदलामुळे उतरणीला लागेल.*

हवामानबदलाची समस्या आणीबाणीची आहे आणि लहान-मोठ्या प्रमाणात ती या ग्रहावर, इथल्या मानवांवर, झाडांवर व प्राण्यांवर परिणाम करते आहे. परंतु, याचा गरिबांवर प्रमाणाबाहेर परिणाम झालेला आहे. शिवाय, गरीब व विकसनशील राष्ट्रांवर याचा अधिक परिणाम होतो.

संयुक्त राष्ट्रांनी हवामानबदलाविषयी स्थापन केलेल्या आंतरसरकारी समितीने ऑक्टोबर २०१८मध्ये 'ग्लोबल वॉर्मिंग ऑफ १.५० सेल्सियस' हा अहवाल प्रकाशित केला. हवामानबदल ही धिम्या गतीने पार पडत असलेली प्रक्रिया आहे, हा आधीचा व्यापक स्तरावरचा समज या अहवालाने खोटा ठरवला. 'अगदी १.५ अंशांची वाढही करोडो लोकांना गरिबीत ढकलू शकते,' असा अंदाज या अहवालात वर्तवण्यात आला आहे.

हवामानबदलाचा गरिबांवर कशा प्रकारे प्रमाणाबाहेर परिणाम होतो, याबद्दलचा अनुभवजन्य पुरावा वाढत्या स्वरूपात उपलब्ध होतो आहे. हवामानबदलामुळे लोकांना पाणी व अन्न यांचा तुटवडा जाणवतो, आणि या प्राथमिक गरजा पूर्ण करण्यासाठीची स्पर्धा वाढते. यातून विद्यमान संघर्षांची तीव्रता वाढण्यासोबतच नवीन संघर्ष उद्भवण्याची शक्यता वाढते. केप टाउनमध्ये २०१५ साली पाणी संकट उभं राहिलं आणि पाण्याचं दुर्भिक्ष्य जाणवणारं जगातील पहिलं मोठं शहर बनण्याचा धोका अजूनही केप टाउनला भेडसावतो आहे. परंतु, या शहरातील गरीब वसाहतींना गेली कित्येक वर्षं पाण्याचा तुटवडा सहन करावा लागतो आहे, एवढंच नव्हे तर या संकटाचीही सर्वाधिक झळ त्यांना पोचणार आहे. डेमॉक्रेटिक रिपब्लिक ऑफ कोंगोमध्ये पावसाच्या आगमनाची वेळ आणि आकृतिबंध यांमध्ये बदल झाल्यामुळे अन्नउत्पादन घटलं आहे आणि सुपीक जमिनीवरील स्पर्धा वाढली आहे, शिवाय देशातील वांशिक तणाव व संघर्षही वाढले आहेत. अशा संघर्षांचा सर्वाधिक फटका गरिबांना बसतो, आणि गरिबी व विस्थापन यांसारख्या समस्यांमध्ये वाढ होते, त्यातून लोक दुष्टचक्रामध्ये अडकतात.

हवामानबदलामुळे पुरांची व दुष्काळांची वारंवारिता वाढते, परिणामी अन्न तुटवडा जाणवायला लागतो आणि अन्नाच्या किंमतीत वाढ होते. यामुळे भूक व कुपोषण या समस्या निर्माण होतात. याचाही सर्वांत गंभीर परिणाम गरिबांना सहन करावा लागतो. जागतिक अन्न कार्यक्रमाने २०१८ साली प्रकाशित केलेल्या 'ग्लोबल रिपोर्ट ऑन फूड क्रायसीस' या अहवालानुसार, हवामानसंबंधित आपत्तींमुळे २३ देशांमध्ये, मुख्यत्वे आफ्रिकेत अन्नसंकटं निर्माण झाली, त्याचे अनेक धक्के बसले- उदाहरणार्थ, दुष्काळामुळे तीन कोटी ९० लाख लोकांची दुर्दशा झाली आणि त्यांना तातडीने मदतीची गरज निर्माण झाली.

'ग्लोबल रिपोर्ट ऑन इन्टर्नल डिसप्लेसमेन्ट' या २०१८ साली प्रकाशित झालेल्या अहवालानुसार, २०१७ साली १४३ देशांमध्ये व प्रदेशांमध्ये संघर्ष व आपत्ती यांच्याशी संबंधित कारणांमुळे तीन कोटी सहा लाख नवीन लोकांना विस्थापन सहन करावं लागलं. याचा अर्थ, दर दिवशी ८० हजार लोक विस्थापित होत आहेत. विस्थापनाला मुख्यत्वे पूर व वादळं (त्यातली उष्णकटिबंधीय चक्रिवादळं) कारणीभूत ठरल्याचं या अहवालात नमूद केलं आहे. पूर आणि वादळांमुळे अनुक्रमे ८६ लाख व ७५ लाख लोक विस्थापित झाले आहेत. हवामानबदलामुळे

निर्वासितावस्थेत गेलेले लोक जगभरात सापडतात– ढाक्यात किनाऱ्यावरील पुरामुळे, प्युर्टो रिकोमध्ये मारिया चक्रिवादळामुळे, किंवा पश्चिम आफ्रिकेत चाड तलाव वैराण पडल्यामुळे विस्थापितांची संख्या वाढतच गेली आहे. हवामानबदलामुळे युरोपीय संघात आश्रय मागणाऱ्या लोकांची संख्या २१०० सालापर्यंत २८ टक्क्यांनी वाढेल, असा अंदाज आहे.

हवामानबदलामुळे भारताला सहन कराव्या लागलेल्या तोट्याचं प्रमाण जगात पाचव्या स्थानावर आहे. देशातील सुमारे ८० कोटी लोक गावांमध्ये राहतात. हे लोक उपजीविकेसाठी शेतीवर व नैसर्गिक संसाधनांवर अवलंबून आहेत. देशातील किमान ५० टक्के शेतजमीन पाणीपुरवठ्यासाठी पावसावर अवलंबून असते, त्यामुळे मान्सूनच्या आकृतिबंधामध्ये बदल झाल्यास त्यांच्या उपजीविकेवर सर्वाधिक परिणाम होतो. अनुभवजन्य पुराव्यानुसार, हवामानबदलामुळे गव्हाच्या उत्पादनात घट झाली आहे आणि कामगारांची उत्पादकताही कमी झाली आहे. हवामानाच्या आकृतिबंधांत दीर्घकालीन बदल होत असल्याची जाणीव लहान शेतकऱ्यांना झाली आहे आणि संभाव्य सामाजिक–आर्थिक बदलांना तोंड देण्यासाठी त्यांनी आपल्या कामकाजात बदल केले आहेत, असं अभ्यासांवरून दिसून येतं. लहान शेतकऱ्यांना पतपुरवठा आणि विम्याची इतर साधनं सहजी उपलब्ध नसतात, त्यामुळे हवामानबदलाच्या बाबतीत ते सर्वाधिक असुरक्षित अवस्थेत असतात. तर, हवामानबदलामुळे गरिबी, कुपोषण व शेतकरी–आत्महत्या यांसारख्या विद्यमान समस्या अधिक गंभीर होतील.

हवामानबदलाशी लढण्यासाठी विकसनशील देशांना आर्थिक पाठबळ देण्याचं आपलं आश्वासन विकसित राष्ट्रांनी पूर्ण करावं, असं आवाहन २०१८ साली झालेल्या कॅटोविच हवामान परिषदेमध्ये भारताने केलं होतं. हवामानबदलाचं संकट निर्माण होण्याला गरीब व विकसनशील देशांनी जवळपास काहीच हातभार लावलेला नसतानाही या देशांना या समस्येचा अधिक फटका बसतो आहे. शिवाय, हवामानबदलाच्या परिणामांना शमवण्यासाठी व त्यांच्याशी जुळवून घेण्यासाठी तडजोड करण्याच्या खटपटीमुळे हेच देश वृद्धी व विकास या संदर्भात मागे पडत आहेत. यासंबंधी तातडीने उपाययोजना केल्या नाहीत, तर जागतिक पातळीवर– विशेषतः भारतामध्ये काही दशकं सुरू राहिलेली वृद्धी व विकास उतरणीला लागण्याचा धोका हवामानबदलामुळे निर्माण झालेला आहे.

गेला काही काळ यासंबंधीच्या धोक्याच्या घंटा वाजत आहेत. हवामानबदल व त्याच्या परिणामांचा विचार करता, विकसित व विकसनशील, श्रीमंत व गरीब, जागतिक उत्तर व दक्षिण यांच्यातील वाढती विषमता कधी नव्हे एवढी स्पष्ट होऊ लागली आहे. ●

**अनु. : प्रतिनिधी**

इकॉनॉमिक अँड पोलिटिकल वीकलीचे विविध संपादकीय लेख अनुवादित करण्यासाठी 'एच. टी. पारेख फाउंडेशन'चे साहाय्य लाभले आहे. (२६ जानेवारी, २ व ९ फेब्रुवारी २०१९ या अंकांतून)

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक लातूरमध्ये मिळण्याचे ठिकाण**

अर्हन्त बुक डिस्ट्रिब्युशन

द्वारा विश्वदिप मेडिकल स्टोअर्स, एच. बी. टेकाळे,
तुळजाई हॉस्पिटलसमोर,
प्रकाशनगर, लातूर
भ्र. ९७६७८०११४०

**परिवर्तनाचा वाटसरूचे अंक नांदेडमध्ये मिळण्याचे ठिकाण**

मीडिया ॲडस्

द्वारा राहूल वाघमारे, विष्णू कॉँप्लेक्स,
हॉटेल ताज पाटील समोर, नांदेड
भ्र. ९८६००८३१३४